EST. 1970

MAHARASHTRA SHIKSHAN SAMITI'S

**MAHARASHTRA MAHAVIDYALAYA, NILANGA**

(Arts, Commerce, Science, Information Technology & Vocational)

**Re-Accredited "B+" Grade** (CGPA-2.62)

NILANGA – 413521 Dist. Latur (Maharashtra State)

**Dr. M.N. Kolpuke**
M.Sc. Ph.D.(Zoology)
**Principal**

## Name of Activity: A Hand of Support to Amol Waghmare

## Date: 30/08/2021

## A Brief Report

Under the name of "A Hand of Support to Amol Waghmare" on dated: 30/08/2021 Rs 250650.61 collected by the college and handed them over to Amol Waghmare's parents as a Economic Support to meet hospital expenses. Amol Waghmare is our student who met with an accident and college decided to provide some help to him and Rs 250650.61 collected from contributions.

## Outcome:

1. Rs 250650.61 collected by the college and handed them over to Amol Waghmare's parents as a Economic Support
2. A sense of social responsibility is sensitized anong staff and students.

Estd- 1970

महाराष्ट्र शिक्षण समिती संचलित

# महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा

(कला, वाणिज्य, विज्ञान, माहिती तंत्रज्ञान, बी.व्होक व व्यवसायिक अभ्यासक्रम)

मेन रोड, निलंगा-413521 जि. लातूर महाराष्ट्र

| स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचा **उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार प्राप्त**<br>फोन. 02384-242015 फॅ. 02384-243015 Web- www.mmnilanga.org<br>ई-मेल principalmmnilanga@gmail.com, mmn1970@rediffmail.com | NAAC Re-accredited<br>(III Cycle) "B+"<br>Grade with CGPA 2.62 | **डॉ. एम.एन. कोलपुके**<br>एम.एस्सी.पीएच.डी.<br>प्र. प्राचार्य |
|---|---|---|

दि. ३०.०८.२०२१

College letter on date: 30/08/2021

Economic Support to Student Amol Waghmare as Hospital Expenses

## विद्यार्थी अमोल गणपत वाघमारे (हाडगा) यांच्या दवाखान्यासाठी

**"एक हात मदतीचा"** A Hand of Support to Amol Waghmare

या मोहिमेत महाराष्ट्र महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या (शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या) वतीने

संकलीत निधी जमा झालेली रक्कम

| विवरण | रक्कम | शेरा |
|---|---|---|
| २०००x २ | ४००० | |
| ५००x३४ | १७००० | |
| २००x७ | १४०० | |
| ५०x४५ | २२५० | |
| १००x ३५ | ३५०० | |
| २०x२१ | ४२० | |
| १०x८७ | ८७० | |
| नाणे (चिल्लर रक्कम) | १८१ | |
| Online जमा झालेली रक्कम | २२१०२९.६१ | |
| **एकूण** | **२५०६५०.६१** | |

Rs 250650.61

अक्षरी - **दोन लाख पन्नासहजार सहाशे पन्नास रुपये व एकसष्ठ पैसे मात्र**

विद्यार्थी अमोल वाघमारे यांच्या वैद्यकीय उपचारासाठी पालकांकडे सदरील निधी जमा करण्यात येत आहे.

**सर्वांचे महाविद्यालयाच्या वतीने मनपुर्वक धन्यवाद...**

मी अमोल वाघमारे याची आई अर्चना वाघमारे असे मी माझ्या स्व:अक्षराने लिहीत आहे की वरील रक्कम (250650.61) माझ्या पर्यंत पोहचली आहे

30/8/21

प्राचार्य
महाराष्ट्र महाविद्यालय (वरिष्ठ)
निलंगा-४१३५२१, जि.लातूर

D:\2020-21\MMN Letter.docx

अर्चना

College letter indicating Rs 250650/- collected and donated to student Amol Waghmare who met with accident

News Clip Published in Reginal News paper lokmat

लोकमत हॅलो लातूर
बुधवार १.९.२०२१
date: 01/09/2021
epaper.lokmat.com

# अपघातग्रस्त दोस्तासाठी धावले मित्र!

## उपचारासाठी अडीच लाख रुपये जमवून दिले आईकडे

गोविंद इंगळे
लोकमत न्यूज नेटवर्क

निलंगा : रक्ताच्या नात्यापेक्षाही घट्ट असलेले मैत्रीचे नाते जागवीत अपघातग्रस्त दोस्तासाठी महाविद्यालयातील युवक-युवती एकत्र आले. कोणाचीच ऐपत नव्हती. मात्र, हिंमत मोठी. सगळ्यांनी मिळून अनेकांच्या दारी जाऊन मित्रासाठी मदतरूपी आशीर्वाद मागितले. आर्थिक परिस्थिती जेमतेम असलेल्या दोस्तासाठी अडीच लाख रुपये जमवून त्याच्या आईकडे सुपुर्द केले.



नॉट मी, बट यू... असे ब्रीद घेऊन श्रमसंस्कार रुजविणाऱ्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी आपली सेवावृत्ती दाखवून दिली. निलंग्यातील महाराष्ट्र महाविद्यालयातील बी.कॉम. द्वितीय वर्षात शिकणारा अमोल गणपत वाघमारे याचे परीक्षेचे प्रवेशपत्र घरी विसरले होते. ते आणण्यासाठी अमोल २३ ऑगस्ट रोजी घराकडे निघाला असता एका दुचाकीने जबर धडक दिली. त्यात त्याच्या मेंदूला गंभीर इजा झाली.

दरम्यान, त्याच्यावर लातुरातील रुग्णालयात उपचार सुरू झाले. घरची परिस्थिती बेताची. कुटुंब अल्पभूधारक. एक लहान भाऊ आणि आई घरकाम करते. अमोल मात्र शिक्षण घेत इलेक्ट्रिशियनची किरकोळ कामे करतो. स्वभाविकच त्याच्या उपचाराचा खर्च आईला परवडणारा नव्हता. अशा वेळी एनएसएसमधून सामाजिक जाणिवेचे धडे घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी शहरात मदतफेरी काढून अडीच लाख रुपये जमविले.

मित्रांनी नि:स्वार्थपणे राबविलेल्या या उपक्रमाचे महाविद्यालयातच नव्हे तर निलंगा शहरात कौतुक झाले. संस्थाध्यक्षांसह प्राध्यापक, कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारली.



महाराष्ट्र महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी अपघातग्रस्त वर्गमित्राच्या मदतीसाठी मदतफेरी काढून अडीच लाख रुपयांचा निधी जमवून प्राचार्यांकडे सुपूर्द केला. विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे महाविद्यालयाकडून कौतुक झाले.

वृंदावन घायाळ, शायरान ढगे, संतोष जाधव, आकाश पोतदार, मयुरी लाटे यांच्यासह एनसीसी आणि एनएसएसच्या विद्यार्थ्यांनी जमविलेला निधी प्राचार्य डॉ. एम.एन. कोलपुके आणि उपप्राचार्य प्रशांत गायकवाड यांच्याकडे सुपुर्द केला. तर महाविद्यालयाने हा निधी तातडीने आईच्या स्वाधीन केला. विद्यार्थ्यांनी केलेल्या धडपडीचे संस्थाध्यक्ष विजय पाटील निलंगेकर यांच्यासह शिक्षकांनी कौतुक केले.

